FORM-1A

N.C.R.B.

I.I.F.-I

# पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

0154169

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( **Under Section 154 Cr. P.C.**)

1. राज्य State: महाराष्ट्र, जिल्हा District: मुंबई, पोलीस ठाणे Police Station: ला.प्र.वि, पहिली खबर क्र. FIR No.: २२, वर्ष Year: २०२२, दिनांक Date: ०६/०३/२२

2. (i) अधिनियम Act: भ्र.प्र. अधिनियम १९८८, कलमे Sections: ७
   (ii) अधिनियम Act ........, कलमे Sections ........
   (iii) इतर अधिनियम व कलने Other Acts and Sections ........

3. (a) अपराधाची घटना : वार Occurrence of offence : Day ........, तारीख पासून Date from: 04/03/22, वेळ Time: १९:००, तारीख पर्यंत Date to: 04/03/22, वेळ Time: १७:००
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date: 03/03/2022, वेळ Time ........
   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No.: 03/22, तारीख Date: 06/03/22, वेळ Time: 08:34

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी, लेखी / तोंडी Written / Oral ........

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. ........, चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. Chouki / Beat / O.P. Name and No. ........
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name: आरे दुध डेअरी, ठिकाणाचे नंबर No. if any: आरे कॉलनी, गल्ली Ward: गोरेगाव, रस्त्याचे नाव Name of road: मुंबई - ४०००६५
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place ........, गाव Village ........, पोस्ट Post ........, तालुका Taluka ........, जिल्हा Dist. ........, राज्य State ........
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव In case, outside the limit of this Police Station ........, तालुका Taluka ........, जिल्हा Dist. ........, राज्य State ........

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव Name: विनयकुमार गुलाबचंद गुप्ता (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name: गुलाबचंद गुप्ता
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age: ३२ वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality: भारतीय, फोन नं. Phone No.: ९८९२९२३३८३
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ........, दिल्याचा दिनांक Date of Issue ........, दिल्याचे ठिकाण Place of Issue ........ (f) व्यवसाय Occupation ........
   (g) धर्म Religion: हिन्दु, जात Caste ........, जनजात Sub-Caste ........
   (h) पत्ता Address : रुम नं. ९९, स्वामी नारायण नगर, आय.आय.टी. मेन गेट मुंबई (प.)
   गल्ली / मार्ग Ward, घर / नाव House/Name No., फोन/मो. नं. Phone/Mo. No., पॅन नं. PAN No., कार्ड नं. Card No.
   रस्त्याचे नाव Road: मुंबई, जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ........, गाव Village ........, पोस्ट Post ........, पो. स्टे. P. Stn. ........
   तालुका Taluka ........, जिल्हा Dist. ........, राज्य State ........, सध्याचा पत्ता Present Address ........

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)

   बापू तानाजी चोरगे, हि. वय ५४ वर्षे, रा.ठी. आरे मिल्क कॉलनी युनीट न. २, आरे दुग्ध वसाहत गोरेगाव पुर्व मुंबई - ४०००६५

Y.P.P.-800 Reg.-(25×6=150 Lvs.)-2-2018-PA3-(K) 829

Scanned with CamScanner

फिर्यादी श्री विनयकुमार गुलाबचंद गुप्ता, वि. ३१ वर्षे यांची तक्रार स्वतंत्र पानावर संगणीकृत करुन वाचून दाखवण्यात आली आहे. सदर तक्रारीस "फिर्याद" म्हणून संबोधण्यात येत आहे.

Vinay

समक्ष

(राहुल कारभारी)
पोलीस निरीक्षक
लाप्रवि मुंबई

Scanned with CamScanner

जवाब दि. ०६/०३/२०२१

श्री. विनयकुमार गुलाबचंद गुप्ता वय ३१वर्ष, धंदा–आरे दुध विक्रि व्यवसाय, रा.ठी.– खो.नं.९९,स्वामी नारायण नगर, आय.आय.टी मेन गेट, पवई , मुंबई. मोबाईल क्र. ९८९२९२३३४३

———•———

मी वरीलप्रमाणे असुन उपरोक्त नमुद पत्त्यावर माझे कुटूंबासह रहावयास आहे. मी पवई आय.आय.टी गेट समोर, आरे दुध सेंटर नं.३००१, पवई, मुंबई येथे मागील दोन वर्षापासुन दुग्ध व्यवसाय करतो. त्यातुन मिळणारे उत्पन्नावर माझे कुटूंबाचा उदरनिर्वाह करतो. मी दररोज सकाळी ०७:३० वा दुध सेंटर उघडतो व रात्री ०८:३० वा च्या सुमारास दुध सेंटर बंद करून घरी जातो.

दि.०१/११/२०२० रोजी दुपारी १.०० वा चे सुमारास मी माझ्या दुध सेंटर वर असताना माझे परीचयाचे डेअरी अधिकारी श्री.बोरसे व त्यांचेसोवत आणखी एक इसम असे दोघेजण माझ्या दुध सेंटर वर आले व दुधसेंटर बंद करून सिल करावयाचे आहे असे सांगितले. मी श्री बोरसे याना दुध सेंटर का बंद करीत आहात? यावद्दल विचारले असता त्यांनी ''तुमच्या दुध सेंटर मधील फ्रिज बंद आहे व तुमच्या दुध सेंटरच्या बाबतीत तक्रारी आहेत,'' असे सांगुन मला दुध सेंटरच्या बाहेर काढून माझे सेंटर सीलबंद केले व ते निघुन गेले.

मी दुसऱ्या दिवशी दि.०२/११/२०२० रोजी आरे डेअरी, गोरेगाव पुर्व, मुंबई येथील कार्यालयात जावून डेअरी अधिकारी श्री. बोरसे यांना भेटलो असता, त्यांनी डेअरी मॅनेजर श्री जी.एन. राऊत व श्री.बापू चोरगे यांना भेटण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी श्री.राऊत व श्री.चोरगे यांना भेटलो असता ''त्यांनी आज या, उद्या या'' असे सांगून मला फिरवत राहीले. वेळोवेळी भेटुनही त्यांनी मला माझे दुध सेंटर उघडू दिले नाही.''

फेब्रुवारी २०२१ मध्ये मी श्री. बापू चोरगे यांना भेटलो असता त्यांनी माझ्याकडे रू.१०,०००/– रक्कमेची मागणी केली व त्यानंतर दुध सेंटर उघडून देतो असे सांगितले. त्याप्रमाणे मी श्री. बापू चोरगे यांना रू.१०,०००/– दिले व माझे दुध सेंटर उघडण्याची विनंती केली असता, त्यांनी दुध सेंटर उघडून देतो असे मला सांगितले, परंतु माझे दुध सेंटर त्यांनी उघडून दिले नाही, म्हणून मी डेअरी मॅनेजर श्री.जी.एन.राऊत यांना त्यांचे बंगल्यावर जावून भेटलो व माझे दुध सेंटर उघडून देण्याची विनंती केली. त्यावेळी डेअरी मॅनेजर श्री जी.एन.राऊत यांनी मला हाताने इशारा करून रू. १०,०००/– मागितले. त्यावेळेस मी त्यांना 'काय'? असे विचारले असता, राऊत यांनी मला **''डेअरी मध्ये जावून बापू चोरगे यांना भेटा''** असे सांगितले. त्याप्रमाणे मी दिनांक ०२/०३/२०२१ रोजी बापू चोरगे यांना डेअरी मध्ये जावून भेटलो असता, श्री.चोरगे यांनी मला रू.१५,०००/– व एक दारूचा खंबा घेवून दि. ०५/०३/२०२१ रोजी भेटण्यास या, आशी मागणी करुन, त्या शिवाय तुमचे दुधसेंटर उघडणार नाही असे सांगितले.

गोरेगांव दुध डेअरी, गोरेगाव पुर्व, मुंबई या कार्यालयातील श्री. बापू चोरगे, कनिष्ठ लिपिक, यांना लाचेची रक्कम देण्याची माझी इच्छा नसल्याने मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे दिनांक ०३/०३/२०२१ रोजी समक्ष हजर राहून लाप्रवि मुंबई कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी यांना भेटलो. वरिष्ठांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे पो.नि. कारभारी यांना भेटलो असता त्यांनी गोरेगांव दुध डेअरी, गोरेगाव पुर्व, मुंबई या कार्यालयातील कनिष्ठ लिपिक, श्री. चोरगे हे लाचेची मागणी करीत असल्याबाबत माझा लेखी तक्रार अर्ज स्वहस्तक्षरात लिहून घेतला व त्यावर माझी सही घेतली. श्री. चोरगे यांनी दि. ०५/०३/२०२१ रोजी मला भेटण्याकरीता बोलाविल्याने पो.नि. कारभारी यांनी माझे अर्जावर दि. ०५/०३/२०२१ रोजी कारवाई करण्यात येईल असे सांगुन मला दिनांक ०५/०३/२०२१ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई कार्यालयास सकाळी येण्यास सांगितले.

Viney

Scanned with CamScanner

दरम्यानच्या कालावधीत दि. ०४/०३/२०२१ रोजी श्री. चोरगे यांनी त्यांचे मोबाईल क्र.९०२२४१२२०० वरून माझे मोबाईल क्र. ९८९२९२३३४३ यावर संपर्क करून दि. ०५/०३/२०२१ रोजी गोरेगांव दुध डेअरी कार्यालयात एक दारूचा खंबा व लाचेची रक्कम रू.१५,०००/ घेवुन येण्यास मला सांगितले असल्याचे मी पो.नि. कारभारी यांना फोनद्वारे सांगितले.

दिनांक ०५/०३/२०२१ रोजी मी पो.नि. कारभारी यांना फोन करून आज रोजी मला माझ्या वैयक्तिक अडचणीमुळे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी मुंबई येथे येणे अशक्य होत असल्याचे व लोकसेवक यांचे कार्यालयात लवकर पोंहचणे आवश्यक असल्याने, गोरेगाव पिकनिक पॉईट येथे येण्याबाबत सांगितले. मी सांगितल्याप्रमाणे पो.नि. कारभारी व पथक गोरेगाव पिकनिक पॉईट, गोरेगाव पुर्व, मुंबई येथे आले. सदर ठिकाणी मी ॲक्टीव्हा दुचाकी वाहन क्र. एमएच ०३–डीबी–०२८९ घेवुन आलो होतो. त्यानंतर पो.नि कारभारी यांनी दोन शासकीय पंचांशी व स.पो.आ. गोरडे, पो.नि. वळवी यांचेशी माझी ओळख करून दिली. त्यानंतर पो.नि. कारभारी यांनी पंचांना थोडक्यात हकिकत सांगून मी दिनांक ०३/०३/२०२१ रोजी केलेला तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. पो.नि.कारभारी यांचे सुचनेवरून सदरच्या तक्रार अर्जावर दोन शासकीय पंचांनी स्वाक्षरी करून पो.नि. कारभारी यांनी स्वतः स्वाक्षरी करून तक्रार अर्ज स्वतःचे ताब्यात ठेवला.

त्यानंतर पो.नि कारभारी यांनी आज रोजी पंचांसमक्ष गोरेगांव दुध डेअरी, गोरेगाव पुर्व, मुंबई येथील कार्यालयाच्या ठिकाणी माझे तक्रारीच्या अनुषंगाने पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगितले. पडताळणी दरम्यान माझे शर्टाच्या आतील बनियनला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावण्यात येणार असुन होणारे संभाषण ध्वनीमुद्रीत करण्यात येणार असल्याचे मला सांगितले.

दरम्यानच्या कालावधीत आज दि. ०५/०३/२०२१ रोजी सकाळी मी घरी असताना श्री. चोरगे यांनी पुन्हा त्यांचे मोबाईल क्र.९०२२४१२२०० वरून माझे मोबाईल क्र. ९८९२९२३३४३ यावर वर संपर्क करून एक दारूचा खंबा व लाचेची रक्कम घेवुन ११.३० वाजेपर्यंत गोरेगांव दुध डेअरी, गोरेगाव पुर्व, मुंबई येथील कार्यालयात येण्यास सांगितले असल्याचे मी पो.नि. कारभारी यांना सांगितले.

पो.नि. कारभारी यांनी माझी पडताळणी पथकाची ओळख करून दिली. त्यानंतर मला पो.नि.कारभारी यांनी श्री. चोरगे यांचे गोरेगांव दुध डेअरी, गोरेगाव पुर्व, मुंबई येथील कार्यालयात पडताळणीकरीता डिजीटल रेकॉर्डर चालू करून शर्टाचे आतील बनियनला लावून पंच क्र. १ श्री. डुबल यांचेसह मी आणलेली ॲक्टीव्हा दुचाकी वाहन क्र. एमएच ०३–डीबी–०२८९ सोबत पाठविले. माझी कनिष्ठ लिपीक श्री. चोरगे यांच्याशी भेट झाली. त्यावेळी श्री. चोरगे यांचेशी कामासंदर्भात चर्चा झाली. चर्चेदरम्यान लोकसेवक श्री.चोरगे यांनी माझेकडे **"वो लाया क्या? पैसा.."** असे म्हणुन दारूच्या खंब्याची व रू. १५,०००/– लाचेच्या रक्कमे बाबत विचारणा केली व तडजोडीअंती दारूचा खंबा सोडून रू. १५,०००/– लाचेची रक्कमेची मागणी केली असता मी त्यांच्याकडे पैशाची व्यवस्था करण्याकरीता वेळ मागुन घेतला. श्री राऊत हे कार्यालयात हजर नसल्याने त्यांची भेट झाली नाही.

त्यानंतर मी पुन्हा पिकनिक पॉईट, आरे, गोरेगाव पुर्व, मुंबई येथे उभ्या असलेल्या पोलीस वाहनाजवळ आलो. पो.नि. कारभारी यांनी व्हाईस रेकॉर्डर काढून झालेल्या संभाषणाची हकीकत विचारून व्हाईस रेकॉर्डरमधील संभाषण पंचासमक्ष ऐकले. लोकसेवक श्री. चोरगे याने पडताळणी दरम्यान लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. लोकसेवक याने लाचेची रक्कम तात्काळ मागणी केली असल्याने त्वरीत सापळा कारवाई करावयाची आहे, त्याप्रमाणे मला सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबतच्या सुचना पो.नि.कारभारी यांनी दिल्या. त्यानंतर माझेकडुन लाचेकरीता वापरण्यात येणारी रक्कम रू. १५,०००/– (रू. २००० दराच्या ४ व रू. ५०० दराच्या १४ भारतीय चलनी नोटा) स्वतःचे ताब्यात घेतल्या. श्री चोरगे यांनी मला पैसे पाकिटात घालुन आणणेबाबत सांगितले होते म्हणुन एका खाकी रंगाच्या पाकिटात सदरची रक्कम ठेवणेबाबत मी पो.नि.कारभारी यांना सांगीतले. त्याप्रमणे पो.नि. कारभारी यांनी सदर खाकी रंगाच्या पाकीटास व नोटांना ॲथ्रासीन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन

Vinay

Scanned with CamScanner

२२४९२२००
गांव दुग्ध डेअरी
ते मी पो.नि.

अँथ्रासीन पावडरचे गुणधर्म समजावुन सांगितले. पो.नि.कारभारी यांनी लोकसेवक यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर मला माझे तोंडावर वारंवार हातरूमाल फिरवुन पुर्वनियोजीत इशारा करावा असे सांगितले. त्यावेळी पोलीस पथक हे कोणास संशय येणार नाही असे थांबून पुर्वनियोजीत इशारा मिळताच लोकसेवक यांस रंगेहात पकडतील असे सांगितले.

त्यानंतर पिकनिक पॉईट, आरे, गोरेगाव, मुंबई येथे पोलीस वाहनात पंचासमक्ष लाचेच्या रक्कमेस अँथ्रासीन पावडर लावून सदरची रक्कम एका खाकी रंगाच्या पाकीटात ठेवून पाकीटास वरून अँथ्रासीन पावडर लावली व माझे पॅटच्या उजव्या खिशात ठेवली. पो.नि. कारभारी यांनी माझे शर्टाचे आतील बनियनला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून पंच क्रं. १ श्री. डुबल यांचेसह सापळा कारवाईकरीता लोकसेवक श्री. चोरगे यांचे गोरेगाव दुग्धडेअरी, गोरेगाव पुर्व, मुंबई येथील कार्यालयात पाठविले. माझे पाठोपाठ पोलीस पथक काहि अंतर ठेवून होते. मी लोकसेवक श्री. चोरगे यांच्या कार्यालयात गेलो असता लोकसेवक श्री. चोरगे मिळुन आले. लोकसेवक चोरगे यांच्याशी कामा संदर्भात चर्चा करून मला बिल्डिंगच्या तळमजल्यावर आणले व तेथे असतानाच लोकसेवक यांनी पंचासमक्ष "कितना लाया ? पंधरा पुरा लाया तो ही करेगा " असे म्हणुन लाचेच्या रक्कमेची विचारणा केली व "दे दो" असे म्हणुन लाच मागणी लोकसेवक श्री.चोरगे यांनी केल्यानंतर मी माझेकडील अँथ्रासीन पावडर लावलेली खाकी रंगाचे पाकीट ज्यामध्ये लाचेची रक्कमचे रू. १५,०००/– ( रू. २००० दराच्या ४ व रू. ५०० दराच्या १४ भारतीय चलनी नोटा ) ठेवलेल पाकीट त्यांना दिले असता, त्यांनी त्यांच्या उजव्या हाताने स्वीकारुन पॅटच्या पुढील उजव्या खिशात ठेवले. तेथुन आम्ही पहिल्या मजल्यावरील श्री. वसावे यांच्या केबीनमध्ये येवुन बसलो तेथे श्री. वसावे हे माझे सेंटरच्या चावीचा शोध घेत असताना, लोकसेवक श्री. चोरगे यांनी लाचेची रक्कम घेतल्यानंतर मी सापळा पथकास दिसेल अशा रीतीने माझे तोंडावर वारंवार हातरूमाल फिरवुन पुर्वनियोजीत इशारा केला. त्यावेळी पोलीस पथकाने तात्काळ लोकसेवक श्री.चोरगे यांस रू. १५,०००/– लाचेच्या रक्कमेसह रंगेहात पकडले.

सदर वेळी पोलिसांनी त्या लोकसेवकास त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे संपुर्ण नाव श्री. बापू तानाजी चोरगे, वय ५३ वर्षे, धंदा – नोकरी, कनिष्ठ लिपिक, मध्यवर्ती दुग्धशाळा, आरे, गोरेगाव, मुंबई, तसेच रा. ठि. युनिट नं.२, बंगला नं.१, आरे मिल्क कॉलनी, गोरेगाव पुर्व, मुंबई असे असल्याचे पंचांना व पोलीस पथकास सांगितले.

मी माझे पवई आय.आय.टी गेट समोर आरे दुध सेंटर नं.३००१ येथील दुध सेंटर सीलबंद केल्याने व ते पुन्हा चालू करण्याकरीता मध्यवर्ती दुग्धशाळा, आरे, गोरेगाव, मुंबई येथील कनिष्ठ लिपीक श्री. चोरगे यांनी माझेकडुन दिनांक ०५/०३/२०२१ रोजी तडजोडीअंती ठरलेली रू. १५,०००/– लाचेची रक्कम स्वत:साठी स्विकारली म्हणुन माझी त्याचेविरूध्द फिर्याद आहे. माझे लोकसेवक श्री. चोरगे यांचेशी कोणतेही पुर्ववैमनस्य अथवा आर्थिक देवाणघेवाणीचे व्यवहार नाहीत.

माझी वरील फिर्याद मराठीत लॅपटॉपवर टंकलिखीत केली असून ती मी वाचुन पाहीली ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष,

( राहूल कारभारी ),
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

Vinay

Scanned with CamScanner

तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ...............................................................

Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

...............................................................................................................................................

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ..............................................................................

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ..............................................................................

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील ता.वे. व ठि. 'फि' हे पवई आय.आय.टी. गेट समोर दुग्ध सेंटर चालवितात. दि.७/११/२०२० रोजी 'फि' हे नेहमीप्रमाणे दुग्ध सेंटर वर असताना डेअरी अधिकारी श्री. बोरसे व त्यांचे सोबत अनोळखी एक इसम असे दोघेजण त्यांचे दुग्ध सेंटर वर आले व त्यांनी 'फि' यांना दुग्ध सेंटर मधील फ्रिज बंद आहे व दुग्ध सेंटरच्या बाबतीत तक्रारी आहेत असे सांगून दुग्ध सेंटरच्या बाहेर 'फि' यांना काढून त्यांचे दुग्ध सेंटर सीलबंद केले व निघून गेले. सदर दुग्ध सेंटर चालू करण्याकरीता आलोसे यांनी 'फि' यांचेकडे लाच म्हणून ३५,०००/- रु व दारुचा खंबा अशी लाचेची मागणी केली. दि.०५/०३/२०२१ रोजी आलोसे यांनी तडजोडी अंती लाच म्हणून १५,०००/- रु. स्विकारताना रंगेहात पकडण्यात आले म्हणून गुन्हा नोंद

13. केलेली कार्यवाही – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

..............................................................................................

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

..............................................................................................

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ......................, जिल्हा ................., राज्य .................

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)................. Rank............... No............... to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to.................................................... (3) Transferred to P. S. ..................................................
District.................................................... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.)

Vinay

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही. [illegible]
Signature of Officer in-charge, Police Station
संपूर्ण नाव Name ....राहुल कारभारी.....
पदनाम Rank.......पोलीस निरीक्षक.....
तपासिक अं. चा कोड क्र. .................................
Posting
Code No. of I. O. ...............................................

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख...................
1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of First Information Report

[illegible]

Scanned with CamScanner